# G. G. DANDEKAR MACHINE WORKS LTD.

DANDEKAR
Built to Last

Ref No.: GGD/Sec./2021/02/01
Date: February 1, 2021

BSE Scrip Code: **505250**

To
Corporate Relationship Department
BSE Limited
1st Floor, P. J. Towers
Dalal Street, Fort,
Mumbai - 400 001

Dear Sir/Madam,

**Subject: Copies of Board Meeting Notice published in Newspapers**

Please find enclosed copies of notice published in The Free Press Journal (English) and Mahasagar (Marathi), regarding notice of the Board Meeting scheduled to be held on February 9, 2021.

You are requested to take the same on records.

Thanking You
Yours Faithfully,

For **G. G. Dandekar Machine Works Limited**

Sayalee Yengul
**Company Secretary & Compliance Officer**

Encl: As above

# 'ओबीसी समाजाची जातीनुसार जनगणना व्हावी', पडळकर देणार मोदींना पत्र

**नागपूर (श.प्र.) :** ओबीसी समाजाची जातीनुसार जनगणना व्हावी, अशी मागणी भाजप नेते आणि विधानपरिषद आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. ओबीसींच्या मुलांनाही बाहेर देशात शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यामुळे केंद्र सरकारने ओबीसींची जातनिहाय जनगणना केली पाहिजे. ओबीसी समाजाच्या जातीनुसार जणगणनेसाठी उद्या(रविवार ३१ जाने)ला पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र देणार असल्याचेही पडळकरांनी सांगितले. ते शनिवारी नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते.

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यानंतर ओबीसी समाजाच्या जातीनुसार जनगणना व्हावी यासाठी गोपीचंद पडळकरांनी आक्रमक पावित्रा घेतला आहे. ओबीसी समाजाची जातीनुसार जनगणना व्हावी, यासाठी उद्या पंतप्रधान मोदींना पत्र देऊ. ओबीसींच्या जातीनुसार जणगणनेसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करु, अशीही माहिती पडळकरांनी दिली. भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्यानंतर पडळकर यांनी ही मागणी केली आहे. त्यामुळे ओबीसींच्या जनगणनेची मागणी आता जोर धरेल, असे बोलले जात आहे.



पडळकर म्हणाले, ८ ऑगस्ट २०१९ रोजी तत्कालीन सरकारने महाज्योतीची स्थापना केली. त्यावेळी तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाज्योतीसाठी ३८० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये विधानसभेची निवडणूक झाली आणि विश्वासघातामुळे सत्ता गेली. महाविकास आघाडी सरकारने महाज्योतीकडे दुर्लक्ष केले. जाणीवपूर्वक निधी दिला नाही. खुप मागण्या झाल्यानंतर ८० कोटी रुपयांचा निधी दिला. ओबीसीमध्ये ३४६ जातींचा समावेश आहे. येवढ्या निधीत प्रत्येक जातीच्या वाट्याला तुटपुंजी रक्कम येते. हा मोठा अन्याय या सरकारने केला. बार्टी आणि सारथीच्या तुलनेत हा निधी एकदमच कमी आहे. त्यामुळे महाज्योतीला ५०० कोटी रुपयांचा निधी सरकारने द्यावा. ओबीसी विभागाच्या मंत्र्यांनी १० हजार युवकांना पोलिस प्रशिक्षण देण्याची घोषणा भाषणातून केली. पण ती केवळ घोषणा होती. या प्रशिक्षणासाठी कर्मचारी, राहणे, खाणे-पिणे या गोष्टींचे कुठलेही नियोजन नव्हते. केवळ टाळ्या आणि शिट्ट्या घेण्यासाठी या सरकारमधील मंत्री अशी भाषणे करीत असल्याचा घणाघाती आरोप पडळकरांनी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्यावर केला.

### सारथीला देता, मग महाज्योतीला का नाही ?

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सारथीला भरभरून निधी दिला. मग महाज्योतीला निधी देताना यांचे हात का थरथरतात, असा प्रश्न पडळकरांनी उपस्थित केला. या सरकारने जर काही केले असेल, तर फक्त महाज्योतीचे कार्यालय पुण्यातून नागपुरला आणले. ते चांगले केले, त्यात कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण निधीच्या नावावर ठणठणाट आहे.

# आज १.९५ लाख बालकांना देण्यात येणार पोलिओचे डोस

**नागपूर (श.प्र.) :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम आज (३१ जाने)ला राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागात १ लाख ९५ हजार ८२ बालकांना पोलिओचा डोस देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. देवेंद्र पातुरकर यांनी दिली. पल्स पोलिओ लसीकरणाचा वयोगट ० ते ५ वर्षांचा असून या बालकांना पोलिओ लसीचे डोस देण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात एकूण २३४३ लसीकरण बुथ असून ५४२९ कर्मचाऱ्यांमार्फत पोलिओ लसीचे डोस देण्यात येणार आहे. या लसीकरणासाठी जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, नगरपालिका दवाखाने, महानगरपालिका येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांचे जिल्हास्तर एक दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. तसेच गाव पातळीवर आरोग्यसेवक, सेविका, आशा स्वयंसेविका या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. आज होणाऱ्या लसीकरण मोहिमेतून ग्रामीण भागात सुटलेल्या बालकांना २ फेब्रुवारीपासून ३ दिवस व शहरी भागात सलग ५ दिवस घरोघरी जाऊन पोलिओ लस पाजण्यात येणार



आहे. पोलिओ लसीपासून एकही लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी जिल्ह्यात २०९ ट्रान्झिट टिमद्वारे बसस्टँड, रेल्वेस्टेशन, धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी व १३० मोबाईल टिमद्वारे कामगार, भटके लोक, रस्त्यावरील मजुरी करणाऱ्या लोकांची मुले यांना पोलिओ लसीचे डोस पाजण्यात येणार आहेत. या मोहिमेमध्ये आपल्या ० ते ५ वर्ष वयाच्या मुलांना यापूर्वी पोलिओ डोस दिला असला तरी या मोहिमेमध्ये पोलिओ लसीकरण करून घ्यावे व मोहिम शंभर टक्के यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केले आहे.

# समायोजना विरोधात शिक्षकांच्या सीईओंकडे तक्रारी

**नागपूर (श.प्र.) :** गेल्या अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या जिल्हा परिषदेच्या माध्यमिक व प्राथमिक शाळेतील तब्बल ५२ शिक्षकांचे गुरुवारला समायोजन करण्यात आले. त्यामुळे शिक्षकांमध्ये चांगलेच नाराजीचे वातावरण पसरले आहे. हे समायोजन दोषपूर्ण असल्याच्या तक्रारी काही शिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर यांच्याकडे केल्या आहेत.

शहरातील सीताबर्डी स्थित पटवर्धन हायस्कूल व काटोल मार्गावरील जि.प. हायस्कूल येथे शिक्षकांच्या मंजूर पदांपेक्षा कार्यरत शिक्षकांची संख्या अधिक होती. विशेष म्हणजे पटवर्धन हायस्कूल




येथे तर चक्क २ विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तब्बल सहा शिक्षक होते. तर काटोल मार्गावरील शाळेत ८ पदे मंजूर असताना १७ शिक्षक कार्यरत होते. त्यामुळे जि.प.ने माध्यमिक विभागाच्या १४ शिक्षकांची व प्राथमिक शाळेच्या अतिरिक्त ठरलेल्या ३८ शिक्षकांचे समायोजन केले. समायोजनात काही शिक्षकांना ज्या पदस्थापना मिळाल्या, त्यावर शिक्षकांनी आक्षेप घेतला आहे. तर काहींनी याचे स्वागतही केल्याची माहिती आहे. एका शिक्षकाचे म्हणणे आहे की, आदिवासी क्षेत्रात सेवा दिलेली असताना समायोजनाच्या प्रक्रियेत पुन्हा त्याच तालुक्यात पदस्थापना देण्यात आली. पतीपत्नी एकत्रीकरणांर्तगत ३० किलोमीटरच्या आत पदस्थापना देण्याचे शासन धोरण आहे. समायोजनात याचा विचार केला नाही.

एका शिक्षकाने आरोप केला की शाळेच्या पटसंख्येनुसार अतिरिक्त ठरत नसतानाही अतिरिक्त केले. काही शिक्षकांनी आरोप केला आहे की, भाषा विषय संवर्गात एकूण ९ शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आले. समुपदेशनात प्राधान्यक्रमातील तीन शिक्षकासाठी ३ जागा डिस्प्लेवर दाखविण्यात येऊन समायोजन करण्यात आले. त्यानंतर सामाजिक शास्त्र संवर्गातील शिक्षकांचे समुपदेशन घेण्यात आले. त्यानंतर पुन्हा भाषा संवर्गातील ९ पैकी ६ शिक्षकांना उर्वरीत सर्व जागा सामाजिक शास्त्रासह रिक्त दर्शवून उपलब्ध करून देण्यात आल्या. प्राधान्यक्रमाव्यतिरिक्तही शिक्षकांना सोयीच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात आली. अशा काही शिक्षकांच्या तक्रारी आहेत. यासंदर्भात त्यांनी सीईओंकडे तक्रारी दाखल केल्याची माहिती आहे.

# यासाठी राज्यपालांनी राज्य सरकारला खडसावले..

**नागपूर (श.प्र.) :** राज्यात इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झाले आहे. अशावेळी महाविद्यालये व विद्यापीठातील प्रत्यक्ष वर्ग सुरू न होणे विसंगत व विपरीत वाटत असल्याचे मत राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी व्यक्त करीत, राज्याच्या कारभारावर टिका केली आहे. विद्यापीठ महाविद्यालयांत वर्ग सुरू करण्यास तयार आहे, पण राज्य सरकारने त्यासाठी परवानगी न दिल्याने राज्यपालांनी सरकारला खडसावले आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. यावेळी सर्वच कुलगुरूंनी राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याची मागणी केली असता,



त्यास उत्तर देताना ते बोलत होते. बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओमप्रकाश गुप्ता तसेच राज्यातील सर्व २० विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

राज्यातील सर्व उच्च शिक्षण संस्था व महाविद्यालयातील वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी आहे. मात्र शासनाच्या परवानगीशिवाय महाविद्यालये सुरू करता येत नाही. महाविद्यालयातील वर्ग त्वरित सुरू करावे, अशी मागणी विद्यार्थीदेखील करीत आहेत. त्यामुळे राज्यातील महाविद्यालयांना प्रत्यक्ष वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठांना अनुमती द्यावी, अशी एकमुखी मागणी राज्यातील सर्व विद्यापीठाच्या कुलगुरूंनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचेकडे केली. त्यावर राज्यपाल म्हणाले, विद्यापीठांनी आपली शैक्षणिक वर्षे अगोदरच सुरू केली आहेत व ऑनलाइन पद्धतीने वर्ग देखील होत आहेत. आता कोरोना परिस्थिती नियंत्रणात येत आहे. अशावेळी महाविद्यालयीन वर्ग सुरू करता येतील का किंवा पाळीमध्ये चालवता येतील का, याचा विद्यापीठांनी विचार करावा, असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील महाविद्यालये कसे सुरु करावे, याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठांनी वर्ग सुरु करण्याबद्दल आपण होऊन पुढाकार घेतला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. राज्यातील सर्व विद्यापीठांनी आपापले लेखापरीक्षण नियमितपणे करून घ्यावे अशीही सूचना राज्यपालांनी विद्यापीठांना केली.

# बनावट परफ्युम कंपनीचा भंडाफोड, घरीच तयार करत होता बॉडी स्प्रे; प्रतापनगर पोलिसांची कारवाई

**नागपूर (श.प्र.) :** प्रतिष्ठित आणि ब्रांडेड कंपनीच्या नावाने बनावट परफ्युम आणि बॉडी स्प्रे तयार करून त्याची शहरात विक्री करण्यात येत असल्याच्या तक्रारीवरून प्रतापनगर पोलिसांनी अशोक कॉलनी, प्रतापनगर येथे धाड मारून बनावट कारखाण्याचा भंडाफोड केला. बनावट परफ्युम व बॉडी स्पे तयार करून उपराजधानीत त्याची विक्री करण्यात येत होती. ही बाब कंपनीच्याच लक्षात आली. कंपनीने पाठपुरावा केल्यानंतर संजय कुमार शर्मा (२२) हा बनावट साहित्याची विक्री केल्याची बाब पुढे आली. कंपनीचे अनुप कोलप (रा. जोगेश्वरी, मुंबई) यांनी दिलेल्या तक्रारीवरून प्रतापनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला.

देशभरात ब्रांडेड परफ्युम व बॉडी स्प्रेचा वापर मोठ्या प्रमाणावर वापर होतो. यामुळे बनावट साहित्यही विक्रीला येऊ लागले आहे. अशाच एका कंपनीचे साहित्य नागपूरच्या बाजारपेठेत विक्रीला आले. कंपनीकडून पुरवठा कमी असूनही दुकानांमध्ये मोठया प्रमाणावर माल पोहोचत असल्याची बाबा कंपनीच्या लक्षात आली. प्रतापनगर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिनकर ठोसर यांनी तक्रारीची गंभीर दखल घेतली. ठोसर यांच्या मार्गदर्शनात सपोनि विठठल बोयने, पोउपनि साईनाथ बारगळ, दिनेश बावनकर, पोहवा चंद्रमणी सोमकुवर, मनोज निमजे, गजानन पवार, पोशि स्वप्नील करंडे, सारंग भरबत, चेतन चौधरी, यादव, विशाल घुगे आणि पल्लवी तुराणकर यांनी घटनास्थळी धाड घालून शर्मा याच्याकडून एकूण ५ लाख ८४ हजार २२५ रुपयांचा बनावटी मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे साहित्य बनविण्यासाठी त्याने मशिन खरेदी केली होती आणि घरीच बनावट साहित्य तयार करीत असल्याचे पोलिसांच्या धाडीत स्पष्ट झाले.

# महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त मनपाच्या दहाही झोनमध्ये स्वच्छता रॅली

नागपूर (श.प्र.) : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोनमध्ये स्वच्छता रॅली काढण्यात आली. रॅलीद्वारे स्वच्छतेसंबंधी जनजागृतीसह स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये नागरिकांनी सक्रियपणे सहभागी होऊन आपल्या शहराचा दर्जा वाढविण्यात योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांच्या काही छोट्या छोट्या कृती महत्वाच्या आहेत. घराघरांतून कचरा संकलित करणाऱ्या कचरा टाकताना तो ओला आणि सुका वेगवेगळा संकलित करून द्यावा. याशिवाय शासनाकडून प्रतिबंधीत करण्यात आलेल्या सिंगल यूज प्लॉस्टीकचा वापर टाळणे. शहर स्वच्छतेसंबंधी नागरिकांच्या तक्रारीसाठी मनपाद्वारे स्वच्छता ॲप



तयार करण्यात आले आहे. या ॲपचा वापर करण्याचेही आवाहन स्वच्छता रॅलीमधून करण्यात आले. मनपाच्या लक्ष्मीनगर, धरमपेठ, हनुमाननगर, धंतोली, नेहरूनगर, गांधीबाग, सतरंजीपुरा, लकडगंज, आसीनगर आणि मंगळवारी या दहाही झोनमधून स्वच्छता रॅली काढण्यात आली. सहायक आयुक्त गणेश राठोड, प्रकाश वराडे, सुषमा मांडगे, किरण बगडे, हरीश राऊत, अशोक पाटील, विजय हुमने, साधना पाटील यांनी संबधीत झोनच्या रॅलीचे नेतृत्व केले.

धरमपेठ झोनमध्ये गोकुलपेठ, तेलंखेडी, मरारटोली, संजय नगर सिंगल लाईन, पांढराबोडी, बाजीप्रभू नगर, रामनगर आदी भागात स्वच्छता रॅली काढण्यात आली. धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त प्रकाश वराडे यांनी स्वच्छता रॅलीचे नेतृत्व केले. रॅलीमध्ये झोनल अधिकारी दीनदयाल टेंभेकर, जयंत जाधव, विशाल नितनवरे, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी, सुरभी जायस्वाल, मेहुल कोसुरकर, विष्णूदेव यादव, शीतल चौधरी, नम्रता जवेरी, विकास यादव आदी स्वयंसेवक, उपद्रव शोध पथकाचे धनंजय कटरे, मंगल पटले, महेंद्र ठाकरे, शशांक पाटील, वामन गायधने यांच्यासह मनपाचे स्वच्छता कर्मचारी सहभागी होते.

## क्राईम डायरी

### व्यापाऱ्याच्या बॅगमधून रोकड चोरी

**नागपूर.** चंद्रपुरातून खरेदीसाठी आलेल्या किराणा व्यापाऱ्याच्या बॅगमधून अज्ञात आरोपीने ३.०८ लाख रुपयांची रोकड चोरी केली. अंदाज आहे की, ई-रिक्शातूनप्रवासादरम्यान त्यांच्यासोबत बसलेल्या २ महिलांनी ही चोरी केली. या प्रकरणी तहसील पोलिसांनी तिरुपतीनगर, चंद्रपूर निवासी अनिल माधवदास डेंगाणे (४९) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

अनिल यांची चंद्रपूरमध्ये किराणा दुकान आहे. शुक्रवारी दुपारी ते बसने नागपूरला आले. दुपारी १ वाजताच्या सुमारास शहीद चौकाजवळील सौरभ ट्रेडर्समध्ये माल खरेदी करण्यासाठी गेले. पैसे देण्यासाठी बॅग उघडली असता त्यांना धक्काच बसला. बॅगमधील रोख ३ लाख ८ हजार रुपये गायब होते. अनिल यांनी तहसील पोलिसांना सांगितले की, गणेशपेठ बस स्थानकावर उतरल्यानंतर इतवारीला जाण्यासाठी ते एका ई-रिक्शात बसले होते. गांधीबागच्या लाल इमली चौकातून २ महिला त्या रिक्शात बसल्या. शहीद चौकात जाताना त्या महिलांनीच त्यांची नजर चुकवून रोकड लंपास केल्याचा संशय आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासणे सुरू केले आहे.

### वृद्धेची सोन्याची चैन गंडविली

**नागपूर.** पिण्यासाठी पाणी मागण्याच्या बहाण्याने आलेल्या आरोपींनी पितळ, तांबे आणि सोन्याचांदीचे दागिने चमकवून देण्याची थाप मारून एका वृद्धेची सोन्याची चैन गंडविली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी संघ बिल्डिंगजवळ बी.आर.अपार्टमेंट निवासी ज्योती संतोषकुमार जैन (६२) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शनिवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास ज्योती घरी एकट्याच होत्या. या दरम्यान ३५ ते ४० वर्ष वयोगटातील दोन आरोपी त्यांच्या घरी आले. त्यांनी पिण्यासाठी पाणी मागितले. पाणी पिल्यानंतर आरोपींनी ज्योतीला सांगितले की, ते पितळ, तांबे आणि सोन्याचांदीचे दागिने चमकविण्याचे पावडर विकतात. त्यांनी ज्योतीला सोन्याची चैन चमकवून देण्याची थाप मारली. एका डब्यात पावडर आणि पाणी टाकून त्यात चैन ठेवल्याचा देखावा केला. ज्योतीला तो डबा गॅसवर गरम करण्यासाठी ठेवण्यास सांगितले. ज्योती गॅसवर डबा ठेवण्यासाठी जाताच आरोपी चैनसह फरार झाले. फसवणूक झाल्याचे समोर येताच ज्योतीने घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# विविध समाजाने निर्माण केलेल्या वस्तूंचे नागपूर निर्यातकेंद्र बनावे : नितीन गडकरी

**नागपूर (श.प्र.) :** चर्मकार समाजबांधव जसे जोडे-चपला बनवितात तसेच विविध समाजाचे निरनिराळे उद्योग आहेत. या पारंपरिक उद्योगांना आता आधुनिकतेची जोड द्यावी. उत्तम वस्तू निर्मितीचे नागपूर केंद्र बनावे आणि येथून जगात सर्वत्र वस्तू निर्यात व्हाव्यात. स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त नागपूर सोबतच हे शहर आर्थिकदृष्ट्या संपन्न व्हावे, त्या दृष्टीने आता प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. नागपूर महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त शनिवारी (ता. ३०) गठई कामगारांच्या स्टॉलकरिता ३६ कामगारांना अस्थायी जागांचे परवाना पत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी महापौर दयाशंकर तिवारी होते. मंचावर उपमहापौर मनीषा धावडे, स्थायी समिती सभापती विजय झलके, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, माजी महापौर तथा आमदार प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक संजय बंगाले, चर्मकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष भैय्यासाहेब बिघाणे, भाजप महिला आघाडीच्या अध्यक्ष कीर्तिदा अजमेरा, अनुसूचित जाती मोर्चा शहर अध्यक्ष राजेश हाथीबेड उपस्थित होते.

याप्रसंगी पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, आज परिस्थिती बदलली आहे. मार्केट बदलले आहे. कुठलाही समाज जो पारंपरिक व्यवसाय करतो, त्यांनी स्वत:त आणि मार्केटच्या दृष्टीने व्यवसायात बदल घडविणे आवश्यक आहे. आधुनिकतेची जोड देऊन नवे उत्पादन बाजारात आणणे आवश्यक आहे. चर्मकार समाजातील काही होतकरू, हुशार कामगारांना आपल्या मंत्रालयांतर्गत सुरू असलेल्या केंद्रात विशेष प्रशिक्षण देऊ. भविष्यात नागपूर हे जोडे-चपलजगात पुरवठा करणारे केंद्र बनायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. कचऱ्यातून वैभव तयार करण्याकरिता अनेक प्रकल्प आपण सुरू करीत आहोत, केले आहेत, हे सांगताना गडकरी यांनी स्वयंपाकघरातून निघणाऱ्या शिळ्या अन्नाचा वापर घरून त्याचे खतात रूपांतर करून घरीच कसा भाजीपाला सेंद्रीय पद्धतीने तयार




करता येतो, हे सांगत एका मुलाखतीतील ज्येष्ठ कलावंत अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा प्रसंग सांगितला. नागपूरला स्वच्छ, सुंदर नागपूर करण्यासोबतच प्रदुषणमुक्त नागपूर करण्याच्या दिशेने कार्य करायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले.

नागपूर महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकाऱ्यांनी यापुढे इलेक्ट्रिक किंवा सीएनजी वाहनांचा वापर करावा. मनपाच्या आवारात सीएनजी स्टेशन तयार करण्याची सूचना केली. यावेळी त्यांनी नाग नदी प्रकल्प, ई-रिक्षाफुटाळा तलावाचा होणारा कायापालट, अजनी स्टेशनवर भविष्यात करण्यात येणारा बांबूचा उपयोग याबद्दल माहिती दिली. गठई कामगारांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याबद्दल गडकरी यांनी महापौर दयाशंकर तिवारी यांचे अभिनंदन केले.

तत्पूर्वी गडकरी, महापौर दयाशंकर तिवारी यांच्यासह सर्व मान्यवरांनी महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. प्रास्ताविकातून चर्मकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष भैय्यासाहेब बिघाणे यांनी गठई कामगारांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे लढ्याची माहिती देत कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. संचालन उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी केले.

समाजातील प्रत्येक घटकाचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यास आपण प्राधान्य देत आहोत. गठई कामगारांचा प्रश्न गेल्या नऊ वर्षांपासून प्रलंबित होता. तो नऊ दिवसात सोडविण्याचा संकल्प केला. अधिकाऱ्यांच्या मदतीने आज ३६ गठई कामगारांना परवाना पत्र देण्यात येत आहे, याचा अतीव आनंद होत असल्याचे महापौर दयाशंकर तिवारी यांनी सांगितले. गठई कामगार मेहनती आहे. त्यांना आपले काम सोडून केवळ कार्यालयात चकरा माराव्या लागू नये यासाठी मनपातील स्थावर विभागात त्यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष उघडण्यात आल्याचे यावेळी महापौर दयाशंकर तिवारी यांनी सांगितले. यापुढे कुठलाही प्रश्न असल्यास तो सोडविण्यासाठी सरळ आपल्याला संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### उर्वरीत कामगारांना पुढील टप्प्यात परवाने...

सर्व गठई कामगारांना संत रविदास आश्रय योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदान देऊन स्टॉल बांधून देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत मनपाला एकूण १३३ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १०६ अर्ज मंजूर करण्यात आले. यापूर्वी ३५ जणांना स्टॉल वाटप झालेले आहेत. २८ जानेवारीपर्यंत ६३ मागणीपत्र प्राप्त झाले. त्यापैकी ३६ जणांनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली. या लोकांना आज अस्थायी जागांचे परवाने वाटप करण्यात आले. इतरांची प्रक्रिया लवकरच पूर्ण करून पुढील टप्प्यात त्यांना परवाने वाटप करण्यात येणार आहेत.



शनिवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त महापौर दयाशंकर तिवारी यांनी केले अभिवादन!

**G. G. DANDEKAR MACHINE WORKS LIMITED**
**Regd. Office:** 211/A, MIDC, Butibori Industrial Area, Village Kinhi, Tal. Hingana, Dist. Nagpur-441122
**CIN:** L99999MH1938PLC002869; **Tel.:** (07103) 295109;
**E-mail:** cs@ggdandekar.com; **Website:** www.ggdandekar.com

Notice is hereby given that the meeting of the Board of Directors of the Company will be held on Tuesday, 9th February, 2021, *inter alia*, to consider and approve Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2020.
This notice is also available on the Company's website at www.ggdandekar.com and on Stock Exchange website at www.bseindia.com.

By order of the Board of Directors
For **G. G. Dandekar Machine Works Limited**
Sd/-
**Sayalee Yengul**
Company Secretary & Compliance Officer

Place : Nagpur
Date : January 30, 2021

